# पिंपरी चिचंवड पोलीस आयुक्तालय
# हिंजवडी पोलीस स्टेशनच्या कारवाईची
# प्रेसनोट दिनांक ०६/०४/२०२३

## जबरी चोरी व वाहन चोरी करणाऱ्या दोन चोरांना हिंजवडी पोलीसांनी ठोकल्या बेडया त्याचेकडून चोरलेल्या पाच दुचाकी व दोन मोबाईल फोन असा एकुण २,७०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त.

वाहन चोरीचे व जबरी चोरीचे वाढते प्रमाण लक्षात घेता मा.श्री.पोलीस आयुक्त सो, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, यांनी जबरी चोरी व मोटार सायकल चोरीच्या गुन्हयांना आळा घालण्यासाठी उपाय योजना राबविण्यास सांगितल्या असताना हिंजवडी पोलीस ठाणे यांचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ.विवेक मुगळीकर यांनी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांना जबरी चोरी व वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी सुचना व मार्गदर्शन केले असता वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस ठाणे यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार हे हिंजवडी फेज ३ भागात पेट्रोलींग करीत असतांना बातमीदारमार्फत माहीती मिळाली कि, हिंजवडी पोलीस स्टेशन गु.रजि.नं १६०/२०२३ भादवि कलम ३९२,३४ हा जबरी चोरीचा गुन्हा अनिकेत पवार व अक्षय नागरे यांनी मिळुन केला आहे व ते पुन्हा अशाच प्रकारचा गुन्हा करण्यासाठी हिंजवडी फेज २ याठिकाणी थांबले आहेत. तपास पथकातील अधिकारी व स्टाफ यांनी फेज २ सर्कल हिंजवडी येथे जावुन बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाची दोन मुले ही त्यांच्या काळया रंगाच्या स्प्लेंडर मोटार सायकलवर संशयीतरित्या फिरताना दिसल्याने त्यांना स्टाफचे मदतीने ताब्यात घेवुन त्यांना त्यांची नावे पत्ता विचारता त्यांनी त्यांची नावे

१)अनिकेत तुकाराम पवार वय-१९,रा. बाळु ओझरकर यांची रुम,ओझरकरवस्ती,माण,मुळशी,पुणे

२) अक्षय विलास नागरे वय-१९,रा. आण्णा कुंजीर यांची रुम,फेज २,माण,मुळशी,पुणे.

असे असल्याचे सांगितले. दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने त्यांचेकडे सखोल व कौशल्यपुर्वक तपास केला असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याचे कबुल केले आहे.

तसेच आरोपी क्र १ याने हिंजवडी पोलीस स्टेशन हद्दीतील मोटार सायकल चोरीचे गुन्हे केल्याचे कबुल केले आहे. त्यांचेकडुन एकुण पाच टु व्हीलर मोटार सायकली व दोन मोबाईल फोन असा एकुण २,७०,०००/- रुपये (दोन लाख सत्तर हजार रुपये ) किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन त्यांचेकडुन खालील गुन्हे उघडकिस आलेले आहेत.

१) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं. १६०/२०२३ भा.द.वि.कलम ३९२,३४ प्रमाणे.
२) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं. १७५/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
३) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं. १८१/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
४) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं. १४२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.
५) हिंजवडी पोलीस ठाणे गु.र.नं. ३२/२०२३ भा.द.वि.कलम ३७९ प्रमाणे.

सदरची कामगीरी मा.श्री विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मा.श्री. मनोज लोहीया सो, सहा पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मा. श्री संजय शिंदे सो, अपर पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मा. श्री डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २ पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मा. श्री श्रीकांत डिसले सो,सहा.पोलीस आयुक्त वाकड विभाग पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मा.श्री डॉ.विवेक मुगळीकर सो,वरिष्ठ पोलीस निरीक्षक हिंजवडी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तायल व मा. श्री सुनिल दहिफळे, सोन्याबापु देशमुख पोलीस निरीक्षक (गुन्हे)सो, हिंजवडी पोलीस ठाणे,पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली हिंजवडी पोलीस ठाणेकडील तपास पथकातील सागर काटे, राम गोमारे सहा.पोलीस निरीक्षक, सहा.पोलीस उप निरीक्षक बंडु मारणे, बाळकृष्ण शिंदे, पो हवा.बापु धुमाळ, कैलास केंगले, विक्रम कुदळ, योगेश शिंदे, कुणाल शिंदे, पोलीस नाईक रितेश कोळी, अरुण नरळे, श्रीकांत चव्हाण, चंद्रकांत गडदे, पोलीस शिपाई अमर राणे, कारभारी पालवे, ओमप्रकाश कांबळे, दत्तात्रय शिंदे, नरेश बलसाने व परिमंडळ २ ऑफिसचे पोलीस शिपाई पंडीत यांनी केली.

( डॉ.काकासाहेब डोळे )
पोलीस उप आयुक्त ,परि-२
पोलीस आयुक्तालय पिपंरी चिचंवड